# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.02.2025** **वार- बुधवार**

---

**नियुक्ती**

लेफ्टनंट जनरल पंकज राव यांनी पुण्यातील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक आणि कमांडंट म्हणून सूत्रं हाती घेतली आहेत. याच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेले राव 1987 मध्ये भारतीय लष्करामध्ये रुजू झाले. 38 वर्षांच्या अद्वितीय कारकीर्दीमध्ये लेफ्टनंट जनरल पंकज राव यांनी शैक्षणिक, चिकित्सालयीन आणि प्रशासनिक पदांवर काम केले आहे.

**तपासणी**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत गेल्या वर्षी एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत राज्यातील 70 हजार शाळांमधील 18 वर्षे वयापर्यंतच्या 98 लाख मुलांची तपासणी करण्यात आली. यापैकी 2 हजार 164 बालकांवर मोफत हृदय शस्त्रक्रिया  करण्यात आल्या. जन्मत: असलेलं व्यंग, जीवनसत्वांच्या कमतरतेमुळं होणारे आजार आणि इतर अपंगत्व इत्यादींचं वेळेवर निदान करून त्यांच्यावर योग्य उपचार करण्याचं उद्दिष्ट या कार्यक्रमात निश्चित केलं आहे. राज्यातील 18 वर्षांपर्यंतच्या साधारण 2 कोटी मुलांना या कार्यक्रमाचा लाभ होत आहे. अंगणवाडी स्तरावर 6 वर्षांपर्यंतच्या मुलांची वर्षातून दोनदा होणारी आरोग्य तपासणी हा कार्यक्रमाचा महत्त्वाचा घटक आहे, अशी माहिती पुणे सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे देण्यात आली आहे. राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत एकंदर 1 हजार 196 पथकं मंजूर करण्यात आली आहेत. प्रत्येक पथकात 1 वाहन, 2 वैद्यकीय अधिकारी, 1 औषधी निर्माण अधिकारी, 1 परिचारिका यांची नियुक्ती केली आहे.

**मिसिंगलिंक्स**

कोथरुड विधानसभा मतदारसंघातील वाढती वाहतूक कोंडी आणि रस्त्यांच्या समस्येवर त्वरित उपाययोजना करण्यासाठी कोथरुडचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी आज मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन मिसिंग लिंक्ससाठी आवश्यक निधी देण्यासंदर्भात निवेदन दिलं. पाटील यांनी पुणे शहरातील रस्ते विकासामध्ये येणाऱ्या अडथळ्यांविषयी चर्चा करत, वाहतूक कोंडी

सोडवण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याचं सांगितलं. यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे शहरातील रस्ते विकासासाठी आवश्यक तो निधी राज्य सरकारकडून दिला जाईल, अशी ग्वाही दिली.

**कर**
पुणे शहरातील प्रमुख 100 थकबाकीदार मिळकतधारकांकडे 334 कोटी रुपये थकबाकी आहे. त्याची यादी महापालिकेच्या मिळकतकर विभागानं जाहीर केली आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रातल्या 9 लाख 29 हजार मिळकत धारकांनी त्यांचा मिळकत कर जमा केलेला आहे. ज्या मिळकत धारकांनी अद्यापही कराचा भरणा केलेला नाही, त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा उपायुक्त माधव जगताप यांनी दिला आहे.

**जीबीएस**
पिंपरी चिंचवड शहरातही जीबीएसचे संशयित रुग्ण आढळल्यानं या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीनं विविध उपाय योजना करण्यात येत आहे. शहरात ज्या ठिकाणी संशयित रुग्ण आढळले आहेत अशा ठिकाणी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. याबरोबरच सारथी प्रकल्पाच्या मदतीनं हेल्पलाइन कार्यान्वित करण्यात आली आहे. तत्काळ सेवेसाठी सात वैद्यकीय अधिकारी नेमल्याची माहिती महापालिका आरोग्य प्रशासनानं दिली आहे.

**अग्नी सुरक्षा**
पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करणं तसंच जीव आणि मालमत्तेचं रक्षण करण्यासाठी पुरेशा अग्निसुरक्षा सेवेकरिता आकुर्डीमधल्या हेडगेवार भवनजवळ अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहे. या कामासाठी 30 कोटी 64 लाख रुपये निविदा रक्कम निश्चित करण्यात आली असून कामाची मुदत 18 महिने आहे.

**सन्मान**
इंडियन स्टुडन्ट कौन्सिल आणि महाराष्ट्र संचालनालय पुरातत्व विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले जयंती उत्सवाच्या निमित्तानं ज्येष्ठ शिक्षिका, सामाजिक कार्यकर्त्या  अंजली जाधव यांना "सावित्रीच्या लेकी विशेष सन्मान 2025" या राज्यस्तरीय पुरस्कारानं नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या  डॉक्टर मेधा पाटकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.  याप्रसंगी कामगार चळवळीचे नेते डॉ. बाबा आढाव, आणि नाम फाउंडेशनचे मकरंद अनासपुरे उपस्थित होते.

**सूर्य नमस्कार**
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 27 जानेवारीपासून सूर्यनमस्कार जनजागृती सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं होतं. या उपक्रमात खासगी शाळांबरोबरच महापालिका शाळांमधल्या हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**निधन**
वारकरी संप्रदायातील वैचारिक नेतृत्व आणि संत तुकाराम महारांजांचे वंशज हभप शिरीष महाराज मोरे यांचं आज आकस्मिक निधन झालं. ते 30 वर्षांचे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोरे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करुन श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**